INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 16 | ISSUE - 8 | SEPTEMBER – 2026

# बंजारा समाजातील स्थलांतरणाची समस्या संदर्भ यवतमाळ जिल्हा

**हरिष हाटू आडे**
संशोधक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग संशोधन केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. गजानन भा. पाटील**
मार्गदर्शक , प्राचार्य, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर.

**सारांश :**



भारतात भटक्या आणि अर्ध-भटक्या समाजामध्ये बंजारा समाजाचा समावेश होतो. सांस्कृतीक दृष्ट्या आधुनिक समाजापेक्षा वेगळा हा बंजारा समाज आहे. दारिद्र ,उपजीविकेच्या साधनांचा अभाव, शेतीवर अवलंबीत्व , रोजगाराची मर्यादित संधि , नैसर्गिक आपत्ती या कारणामुळे बंजारा समाजातील अनेक कुटुंब हे आपले गाव सोडून शहरांकडे किंवा दुसऱ्या जिल्ह्यात पलायन करीत आहेत. या होणाऱ्या स्थलांतरणामुळे काही अंशी उत्पन्न वाढविण्याची संधि बंजारा समाजातील कुटुंबाना प्राप्त झाली. मात्र या स्थलांतरणामुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत. उदा. आरोग्याची समस्या, निवासाची समस्या, सुरक्षिततेची समस्या, कुटुंबातील महिलांवर पडणारा कमाचा अतिरिक्त ताण, मुलांचे मध्येच शिक्षण सोडण्याचे प्रमाण जास्त इत्यादी समस्या त्यांना जाणवतात. या समस्यांवर मात करण्यासाठी स्थानिकरोजगार निर्मिती करून, बंजारा समाजासाठी असणाऱ्या शासकीय योजनाची प्रभावी अमलबजावणी करून, ग्रामविकास कार्यक्रमाची अमलबजावणी करून आणि रोजगार हमी योजनेअंतर्गत जास्तीत-जास्त दिवसाचा रोजगार उपलब्ध करून देऊन बंजारा कुटुंबामध्ये होणारे स्थलांतरण थांबविले जाऊ शकते व त्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिति सुधारण्यास मदत होऊ शकते.

**बिजशब्द :** हेडीपनो, तांडा, लदेणी

## प्रस्तावना

भारत हा विविध जाती-जमाती विविध धर्म आणि संस्कृतीनी नटलेला देश आहे. संपूर्ण भारतामध्ये कमी अधिक प्रमाणात बंजारा समाज अस्तित्वात आहे. महाराष्ट्रामध्ये बंजारा ही भटक्या व विमुक्त जमातीपैकी एकजमात आहे. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हयामध्ये बंजारा समुदायाची लोकसंख्या जास्त आहे. यवतमाळ जिल्ह्यामध्ये पुसद, उमरखेड, महागाव, केळापूर (पांढरकवडा), आर्णी, दिग्रस ह्या तालुक्यामध्ये बंजारा समाजाची लोकसंख्या ही जास्त आहे. यवतमाळ हा महाराष्ट्रामधील महत्वाचा कापूस उत्पादक जिल्हा आहे. जिल्ह्याची उत्तर सीमा अजिंठा पर्वत रांगांनीव्यापलेली आहे. जिल्ह्याची जमीन कसदार असून तीची पोत काळी व गर्द करड्या रंगाची आहे. जिल्ह्याच्या काही भागातील जमीन ही चुनखडी व वाळूमिश्रित आहे. जिल्ह्यातील नैसर्गिक साधन संपत्ती मध्ये कोळसा आणि चुनखडीचा वाटा खूप मोठा आहे. जिल्ह्यातील एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येपैकी २४.५९ टक्के लोक हे शेती करतात. तर ५४.५५ टक्के लोक हे शेतमजूरी करतात. जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ८२.८२ टक्के एवढे आहे. जिल्ह्यातील सर्वात जास्त लोकसंख्या ही ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. पूर्वी पासून बंजारा समाज हा व्यापार व वाहतूक व्यवसायासी संबंधित आहे. परंतु आधुनिक काळातील सामाजिक,

आर्थिक आणि पर्यावरणीय बदलामुळे त्यांच्या पारंपरिक व्यवसायात घट झाली व त्यांची आर्थिक स्थिति नाजुक झाली. यवतमाळ जिल्ह्यामध्ये बंजारा समाज मोठ्या प्रमाणावर राहतो या समुदायातील अनेक कुटुंबे हे शेतमजूरी, बांधकाम कामगार,आणि असंघटित क्षेत्रातील कामावर अवलंबून आहेत. या कामापासून मिळणाऱ्या मोबदल्यात बंजारा समुदायातील लोक आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करू शकत नाही. यामुळे बंजारा समाजातील कुटुंब हे इतरत्र स्थलांतरण करतात. म्हणून यांच्या स्थलांतरणाची कारणे जाणून घेणे आवश्यक आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे :

यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजात स्थलांतरणामुळे पडणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

## संशोधनाचे गृहीतकृते :

यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजामध्ये स्थलांतरण मोठ्या प्रमाणात होते.

## संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यात पुस्तके, संशोधन लेख, सरकारी अहवाल, मासिके, जनगणना अहवाल, आणि इंटरनेट स्त्रोत यांचा वापर करण्यात आलेला आहे.

## यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजाची लोकसंख्या :

| अ. क्र. | तालुका | पुरुष | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | यवतमाळ | ३८३५२ | ५६५३७ | ११४८८९ |
| २ | पुसद | ७०२८२ | ६६१९२ | १३६४७४ |
| ३ | दारव्हा | ३५१९८ | ४१२४२ | ७६४४० |
| ४ | नेर | ११४६१ | १२५८५ | २४०४६ |
| ५ | दिग्रस | ३४२८८ | २४०१० | ५८२९८ |
| ६ | उमरखेड | ५१६५४ | ४५५७७ | ९७२३१ |
| ७ | महागाव | ३०२६८ | २२३५१ | ५२६१९ |
| ८ | आर्णी | २३३४० | २०८५९ | ५३१९९ |
| ९ | घाटंजी | २४९२२ | १६८५७ | ४१७७९ |
| १० | केळापुर | ७३०३ | ८२७६ | १५५७९ |
| ११ | राळेगाव | ५७४३ | २७४० | ८४८३ |
| १२ | कळंब | ५२४६ | २५२८ | ७७७४ |
| १३ | बाभूळगाव | ४४५५ | २१८० | ६६३४ |
| १४ | झरी जामणी | ३६६३ | २१४७ | ५८१० |
| १५ | वणी | १२०८१ | ४६४५ | १६७२६ |
| १६ | मारेगाव | ४०१४ | १९३० | ५९४४ |
| | एकूण | ३९१२७० | ३३०६५६ | ७२१९३६ |

**संदर्भ – www.census2011.co.in.2011 नुसार**

वरील कोष्टकामध्ये यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजाची लोकसंख्या तालुक्यानुसार दिलेली आहे.

## बंजारा समाजाच्या स्थलांतरणाची कारणे :

स्थलांतरण हे विशेषत रोजगार प्राप्तीसाठी केले जाते. लोकांनी रोजगार, शिक्षण, विवाह किंवा इतर कारणासाठी एकाठिकाणावरुण दुसऱ्या ठिकाणी कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या स्वरूपात जाण्याच्या प्रक्रियेला स्थलांतरण असे म्हणतात. स्थलांतरणाची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १)दारिद्रय :

बंजारा समाज जंगल, तांड्यात राहणारा समाज आहे. शिकार करणे, बांधकाम क्षेत्रात काम करणे, यामुळेत्यांचे मासिक उत्पन्न कमी, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत अनिश्चित आहे. लग्न, आरोग्य, जत्रा आणि इतर सणासाठी ते सावकाराकडून कर्ज घेतात. त्यांनी घेतलेल्या सावकारी कर्जावरील व्याजाचे दर हे जास्त असल्यामुळे बंजारा लोक कर्ज वेळेवर परतफेड करू शकत नाही. त्यामुळे ते पुन्हा कर्जामध्ये गुंततात त्यामुळे त्यांना दारिद्रयात जीवन जगावे लागते.

### २)मागास शेती :

व्यापार हा मुख्य व्यवसाय असणारा बंजारा समाज काळाच्या ओघामध्ये शेती घेऊन स्थिर जीवन जगण्यास सुरुवात केली. शेतीसाठी लागणाऱ्या वस्तू खरेदीसाठी सावकाराकडून कर्ज घेऊ लागले. कर्ज न घेण्याची परंपरा असलेला बंजारा समाजआज शेतीसाठी कर्ज घेऊ लागला. व्याजाच्या जास्त दरामुळे वर्षानूवर्ष कर्जबाजारी राहू लागला. औधोगिकीकरण,नागरीकरण आणि आधुनिकीकरण यामुळे बंजारे शेती व्यवसायमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत परंतु शहरी संस्कृतीशी संबंधित समाज आणि तांडा संस्कृतीशी संबंधित समाज यांच्यात परिवर्तनाचा वेग समान नाही. त्यामुळे या समाजाला आर्थिक अडचणीचा सामना करावा लागतो. यामुळे सुद्धा बंजारा समाजात स्थलांतरणाचे प्रमाण जास्त आहे.

### ३)रोजगार संधीचा अभाव :

बंजारा समाज हा गावाच्या बाहेर तांड्यामध्ये राहतो. तांडा व्यवस्थेत शिक्षणाची संधि कमी, आरोग्याच्या सोईचा अभाव, त्यांच्या पासून औद्योगिक केंद्र दूर असणे, वाहतूक आणि बाजारपेठेची कमतरता, शेतीवर जास्त अवलंबीत्व, कौशल्य प्रशिक्षणाचा अभाव इत्यादी कारणामुळे यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजातील लोकांना रोजगार प्राप्त होत नाही.

### ४)व्यापार :

बंजारा समाज हा परंपरागत जीवनावश्यक वस्तूचा व्यापार करणारा समाज आहे. पारंपरिक जीवन जगणाऱ्या बंजारामध्ये चरीरतार्थ चालावा या मर्यादित हेतूने व्यावसायीक प्रक्रिया चालू होती. त्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था चरितार्थ केंद्रित होती. दीर्घकाळपुरेल एवढे अन्नधान्य साठवणे, नाणे संचईत करणे, स्थावर मालमत्तेत पैसा गुंतविणे या प्रवृतीचा त्यांच्यात मोठ्या प्रमाणात अभाव होता. बंजारा समाज हा समूहाने बैलाची खरेदी- विक्री करीत असत त्याला ‘हेडीपनो’ म्हणत. बैलाच्या साह्याने केल्या जाणाऱ्या व्यापाराला ‘लदेणी’ म्हणत. लदेणी मार्फत बंजारे मीठ,मसाल्याच्या वस्तू ,रेशीम, धान्य, अश्या वस्तूची आयात निर्यात करीत असत. परंतु युरोपियन लोकांच्या आगमनानंतर बंजारांच्या व्यापारी क्षेत्रावर बंधणे आली. दळणवळणाची नव-नवीन साधने अस्तित्वात आली. त्यामुळे बंजारांचा पारंपारिक व्यवसायाचा ऱ्हास झाला. पारंपरिक व्यापार आधुनिक काळामध्ये कालबाह्य झाल्याने बंजारा समाज आर्थिक संकटात सापडला.

### ५)पारंपरिक जीवन पद्धती :

पारंपारिक पद्धतीने जीवन जगणाऱ्या बंजारा समाजामामध्ये स्थिर जीवन जगण्याची प्रवृत्ती नव्हती. त्यामुळे ते जमीनदार, कारखानदार, मोठे व्यापारी बनू शकले नाही. बंजारा समाजामध्ये एक म्हण आहे ‘छुटो चर बंधो मर’ म्हणजे जो मोकळा असतो तो पोटभर खातो आणि जो बंदिस्त असतो तो उपाशी मरतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व्यापारी क्षेत्राला एक नवीन दिशा प्राप्त झाली. या नव्या व्यापारी क्षेत्रात संघर्ष करण्याएवढी आर्थिक, शैक्षणिक क्षमता बंजारा समाजाकडे नसल्यामुळे भांडवली अर्थव्यवस्थेत त्यांचा निभाव लागला नाही. त्यामुळे आजही उदरनिर्वाहासाठी बंजारा समाज स्थलांतर करीत आहे.

## स्थलांतरणाचे परिणाम :

बंजारा समाजामध्ये आज ही मोठ्या प्रमाणात स्थलांतरणाची समस्या अस्तित्वात आहे. या स्थलांतरणाचे दूरगामी परिणाम या समाजावर होताना दिसतात.

**१)शिक्षणावर परिणाम :**

बंजारा समाजातील अनेक कुटुंब रोजगाराच्या शोधात इतर राज्यांमध्ये किंवा जिल्हयामध्ये स्थलांतरण करतात. यामुळेया समाजातील मुलांवर नकारात्मक परिणाम पडतो. मुलांमध्ये शाळा सोडण्याचे प्रमाण वाढते, शिक्षणात खंड पडतो, मुले अभ्यासात मागे पडतात, बालमजुरीची समस्या वाढते, मुलींच्या शिक्षणावर अधिक परिणाम पडतो.

**२)सामाजिक समस्या :**

बंजारा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतरण होत असल्यामुळे सामाजिक समस्याही मोठ्या प्रमाणात आहेत. उदा. स्थलांतरणामुळे एकच कुटुंब वेगवेगळया ठिकाणी रोजगाराच्या शोधात जातात. त्यामुळे कुटुंब विघटणाची समस्या निर्माण होते, आरोग्य आणि स्वछतेच्या समस्या निर्माण होतात, महिलांवरील ताण वाढतो, सांस्कृतीक बदल होतात इत्यादीसामाजिक समस्या निर्माण होतात.

**३)आर्थिक अस्थिरता :**

आर्थिक अस्थिरता म्हणजे समाज किंवा कुटुंब यांच्या उत्पन्नामध्ये सातत्य किंवा स्थिरता नसणे होय. आर्थिक अस्थिरतेमुळे बंजारा समाज हा स्थलांतरण करतो. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात नियमितता नसते. कधी मजूरी प्राप्त होते तर कधी आठवडाभर बेरोजगार राहाव लागते. मिळणारी मजूरी ही कमी असते. घरसोडून बाहेर आल्यानंतर मिळेल त्या मजुरीवर त्यांना काम करावे लागते. कमी मजूरीमुळे बचतीचा अभाव दिसून येतो, बचत कमी असल्यामुळे कर्जबाजारीपणा जास्त दिसून येतो. या कर्जबाजारीपणामुळे विकासाच्या संधि ही कमी होतात.

**४)महिलांवर ताण वाढतो :**

स्थलांतरणामुळे महिलांना दुहेरी भूमिका बजवावी लागते. घरातील सर्व काम करून मजुरीच्या कामावर जावे लागते. स्थलांतरीत कुटुंबातील महिलांना कठोर परिस्थितीत कामे करावी लागतात. उदा. ऊसतोड, शेतमजूरी, बांधकाम इत्यादी. यामुळे महिलांवर ताण वाढत आहे.

अश्याप्रकारे स्थलांतरणाचे परिणाम सांगता येतील.

## स्थलांतरण थांबविण्यासाठी उपाय :

स्थलांतरण थांबविणे ही काळाची गरज आहे. कारण स्थलांतरणामुळे गावच्यागाव ओस पडत आहेत. तर दुसरीकडे शहरामध्ये मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे. या वाढत्या लोकसंख्येचा परिणाम शहरांच्या पायाभूत सुविधांवर पडत आहे. त्यामुळे स्थलांतरण थांबविणे आवश्यक आहे. स्थलांतरण थांबविण्यासाठी उपाय खालील प्रमाणे सांगता येतील.

**१)स्थानिक रोजगार निर्मितीला प्रोत्साहन :**

बंजारा समाजाच्या तांड्या लगत किंवा गावालगत प्रक्रिया उद्योगाची निर्मितीकरणे, आणि या भागामध्ये रोजगार हमी सारख्या योजना प्रभावीपणे राबवून स्थानिक रोजगार निर्मिती करता येते. आणि स्थलांतरणाला आळा घालता येऊ शकते.

**२)कौशल्य विकास प्रशिक्षण :**

बंजारा समाजातील युवक-युवतीना संगणक प्रशिक्षण, दुग्धव्यवसाय प्रशिक्षण, हस्तकला प्रशिक्षण देऊन स्थानिक रोजगार निर्माण करून बंजारा समाजामध्ये होणारे स्थलांतरण थांबविले जाऊ शकते.

**३)शिक्षण प्रसार :**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्वपूर्ण साधन आहे. बंजारा समाजाचे स्थलांतरण थांबविण्यासाठी तांडा भागात शाळा निर्माण केल्या जाव्या, बंजारा समाजातील मुलांसाठी शिष्यवृत्ती सोय करावी व या समाजातील मुलांना वस्तीगृहाची सोय उपलब्ध करून द्यावी. यामुळे या समाजात शिक्षणाबद्दल जागरूकता वाढेल.

**४)शेतीपूरक व्यवसायाचा विकास :**

बंजारा समाज हा मुळात व्यापार करणारा समाज होता. मात्र त्यांनी कालांतराने स्थायी शेती करण्यास सुरुवात केली. परंतु शेती करण्याची पारंपरिक पद्धत, भांडवलाचा अभाव यामुळे आर्थिक संकटात सापडलेला बंजारा हा रोजगारासाठी बाहेर जाऊ लागला. या बंजारा समाजातील शेतकऱ्यांसाठी शासकीय अर्थसाह्य मिळाले, सिंचन सुविधा, कुक्कुट पालन, शेळी पालन आणि योग्य शेती संबंधित प्रशिक्षण मिळाले तर बंजारा समाजातील स्थलांतरण थांबविले जाऊ शकेल.

**५)महिला स्वयंसहाय्यता बचत गट :**

स्थानिक ठिकाणी कमी वेळेत पैसा उपलब्ध करून देणारी महत्वाची संस्था म्हणजे महिला बचत गट होय. या बचत गटाचा विकास करून शेतकऱ्याना कमी व्याज दरावर पैसा उपलब्ध करून दिला जाऊ शकतो. यासाठी शासनाने या गटाना आर्थिक सहाय्य देऊन बंजाराची आर्थिक स्थिति भक्कम करावी. याद्वारे या समाजात होणारे स्थलांतरण थांबविले जाऊ शकते.

**निष्कर्ष :**

बंजारा समाजातील प्रमुख असलेल्या समस्यामध्ये स्थलांतरण ही महत्वपूर्ण समस्या आहे. या समस्येमुळे बंजारा समाजाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि संस्कृती विकास झालेला नाही. रोजगारासाठी होणाऱ्या स्थलांतरणामुळे वेगवेगळ्या संस्कृतीशी त्यांचे संबंध प्रस्थापित झालेले आहेत. त्यामुळे स्वताची संस्कृती टिकविण्याचे मोठे आव्हान या समाजापुढे निर्माण झालेले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन -२०२५ जिल्हा यवतमाळ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र मुंबई
२) प्रा. डॉ. रुक्मिणी पवार 'बंजारा लोकजीवन पद्धती' कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद